## रंगकामाचे कोटेशन (दरपत्रक ) मागवणेबाबत . . .

जा.क्र/आयआयई/...७०.../२०२६
दिनांक: २९ जुलै, २०२६.

# इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन (IIE), पुणे

मा. सदस्य सचिव, आय. आय. ई यांच्या दि. २२.०७.२०२३ च्या मान्यतेनुसार इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन (IIE), पुणे या संस्थेचे केंद्र 'जे. पी. नाईक सेंटर फॉर एज्युकेशन अँण्ड डेव्हलपमेंट, सर्व्हे नं: ६८, शिल्प सारथी सोसायटीच्या जवळ, कोथरूड, पुणे – ४११ ०३८' येथील जी राम रेड्डी सदन वसतिगृह इमारतीचे संपूर्ण रंगकाम करण्यासाठी सिलबंद लिफाफा पद्धतीने रंगकामचे कोटेशन (दरपत्रक) खालील तक्त्यातील दिलेल्या तपशील व सर्व समावेशक अटी व शर्तीसह मागविण्यात येत आहे.

*** कामाचा तपशील व कोटेशन (दरपत्रक ) नमुना तक्ता :-**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | कामाचा तपशील | **जे. पी. नाईक सेंटर फॉर एज्युकेशन अँण्ड डेव्हलपमेंट, सर्व्हे नं: ६८, कोथरूड, पुणे – ४११ ०३८ येथे सभागृह रंगकाम करणे.** (जी राम रेड्डी सदन वसतिगृहा, लेडीज व जेन्ट्स टॉयलेट, गेस्ट रूम, सर्व जिने इत्यादी सह संपूर्ण इमारत आतून बाहेरून जूना रंग घासून पुसून नवीन रंगकाम करणे.) | | | |
| २. | रंगकाम प्रकार | ऑईल बॉंड – दर प्रति स्क्वेअर फुट (Oil Bond- Rate per Sq. Ft. ) | ऑईल पेंट - दर प्रति स्क्वेअर फुट (Oil Paint- Rate per Sq. Ft.) | ड्रायडीस्टेमपर- दर प्रति स्क्वेअर फुट (Dry Distemper- Rate per Sq. Ft.) | एसीई पेंट - दर प्रति स्क्वेअर फुट (ACE Paint- Rate per Sq. Ft.) |
| ३. | सभागृह रंगकामाचे एकूण स्क्वेअर फुट | १७४९५ स्क्वेअर फुट (Sq. Ft.) | ६२५७ स्क्वेअर फुट (Sq. Ft.) | ५८३ स्क्वेअर फुट (Sq. Ft.) | ११५८३ स्क्वेअर फुट (Sq. Ft.) |
| ४. | रंगकाम दर प्रति स्क्वेअर फुट रुपये (Rate per Sq. Ft.) | रुपये (Rs.): | रुपये (Rs.): | रुपये (Rs.): | रुपये (Rs.): |
| ५. | GST Charges (%) | रुपये (Rs.): | रुपये (Rs.): | रुपये (Rs.): | रुपये (Rs.): |
| ६. | एकूण रक्कम GST सह | रुपये (Rs.): | रुपये (Rs.): | रुपये (Rs.): | रुपये (Rs.): |
| ७. | सभागृह रंगकामाचे एकूण रक्कम रुपये: | | रुपये (Rs.): | | |

**** सर्व समावेशक अटी व शर्ती :**

१. सदर रंगकामाबाबतचे आणि दुरुस्ती कामाचे अटी, शर्ती व कोटेशन/दरपत्रक नमुना तक्ता इत्यादी बाबींचा सर्व तपशील संस्थेच्या www.iicpunc.org या संकेत स्थळावर ऑनलाईन पहावयास उपलब्ध आहे.
२. ठेकेदाराने सदरचे कोटेशन/दरपत्रक मा. सदस्य सचिव, आय. आय. ई यांच्या नावे देण्यात यावे.
३. सदरच्या कामाचे कोटेशन/दरपत्रक ठेकेदाराने सिलबंद लिफाफा पद्धतीने देण्यात यावे.
४. सदरच्या कामाचे कोटेशन/दरपत्रक स्विकृती दि. २७.०७.२०२६ ते ०५.०८.२०२६ (वेळ सायं- ६.०० पर्यंत) केली जाईल.
५. सदरच्या कामाचे कोटेशन/दरपत्रकाचे सिलबंद लिफाफे दि. ०७.०८.२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थेच्या मुख्य कार्यालयात 'कार्यक्रम समिती' समोर उघडण्यात येतील.
६. रंगकामाचे कोटेशन (दरपत्रक) रंगकामाच्या मजुरी आणि साहित्य/ रंगाच्या खर्चासह देण्यात यावे.
७. ठेकेदाराने Asian Paints / Nerolac Paints या नामांकित कंपनीचे रंग देणे अनिवार्य आहे.
८. ठेकेदारास रंगकाम करण्यास संस्था कुठलेही साहीत्य अथवा मनुष्यबलळ संस्था पुरवणार नाही.
९. ठेकेदाराने सर्व इमारत घासून पासून घेणे तसेच प्रेशर मशीन व पाण्याच्या साह्याने साफ करणे.
१०. ठेकेदाराने रंगकाम करताना सर्व भिंतीवरील क्रॅक आणि पुट्टी भरूणे.
११. रंगकाम करताना प्रथम प्रायमर मारणे, दोन वेळा रंगाचे हात मारून उत्तम प्रतिचे रंगकाम पूर्ण करणे.
१२. ठेकेदाराने रंगकाम झाल्यानंतर सर्व परिसर स्वच्छ व साफ सफाई करून देणे बंधनकारक आहे.
१३. ठेकेदाराने रंगकामाची वर्क ऑर्डर प्राप्त झाल्यापासून १५ ते २० दिवसांच्या आत रंगकाम करावे, जर ठेकेदाराने
दिलेल्या मुदतीत कार्यवाही व काम पूर्ण न केल्यास तो अपात्र राहील.
१४. ठेकेदाराने एजन्सी /फर्मची सर्व कागदपत्रे (आधार कार्ड , पॅनकार्ड, लायसन्स प्रत, बैंक खाते जी.एस.टी व इतर) नियमानुसार कोटेशन/दरपत्रक सादर करताना सोबत जोडावीत.
१५. ठेकेदाराने मागील ३ वर्षाचे इनकम टॅक्स प्रमाण पत्र देणे बंधनकारक राहील.
१६. ठेकेदाराने मागील ३ वर्षामध्ये समकक्ष हाती घेतलेली कामे व पूर्ण केलेल्या कामांची यादी सादर करणे.
१७. ठेकेदाराने नियमानुसार लागू असलेल्या सर्व शासकीय कपाती सोसावयाच्या आहेत.
१८. कोणत्याही परिस्थिती कोटेशन /दरपत्रक भाववाढ देय असणार नाही.
१९. ठेकेदाराना कामाचे देयक उपलब्ध निधी प्रमाणे प्रदान करण्यात येईल.
२०. सदर रंगकामाचे कोटेशन/दरपत्रक स्वीकारणे, नाकारणे अथवा रद्द करणे याबाबतचे अंतिम सर्व अधिकार संस्थेच्या 'व्यवस्थापन समिती' यांना राहतील याची नोंद घेण्यात यावी.

**महासंचालक**
**इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन,**
**१२८/२, जे.पी. नाईक पथ, कोथरूड, पुणे – ३८**